# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.12.2024** **वार – बुधवार**

---

**रक्तदान**

सत्याहत्ताराव्या लष्कर दिन सोहोळ्याच्या अनुषंगानं दक्षिण कमांडद्वारे मोठ्या प्रमाणात 21 ठिकाणी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात दीडहजारहून अधिक रक्तपिशव्यांचं संकलन करण्यात आलं. प्रमुख नागरी रुग्णालयं आणि सामाजिक संस्थांच्या सहयोगानं झालेल्या या उपक्रमात लष्कराचे कर्मचारी त्यांचे, कुटुंबीय, माजी सैनिक, एनसीसीछात्र, नागरी संरक्षण कर्मचारी, आर्मी पब्लिक स्कूलचे विद्यार्थी आणि शिक्षक आणि स्वयंसेवी रक्तदाते यांनी आपलं कर्त्तव्य पूर्ण केलं.

**रबी**

रबी हंगामात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी पुणे  उपविभागीय कृषी अधिकारी यांनी कृषी सेवा केंद्राची तपासणी सुरू केली आहे. या तपासणीत जुन्नरमधील  निमगाव सावा इथल्या दोन कृषी सेवा केंद्रांममध्ये कालबाह्य कीटकनाशकं आढळली आहेत. या केंद्रांना कारणं दाखवा नोटीस बजाविली आहे अशी माहिती उपविभागीय कृषी अधिकारी सतीश शिरसाट यांनी दिली. कृषी निविष्ठा खरेदी करताना शेतकऱ्यांनी पक्की बिलं घ्यावीत. बियाणं, खतं, कीटकनाशकं यावरील अंतिम दिनाक पाहूनच खरेदी करावी असं आवाहन पुणे जिल्हा कृषी विभागानं केलं आहे.

**जंत**

राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त आजपासून पुणे जिल्ह्यात जंतनाशक गोळ्यांचं वितरण सुरु करण्यात आलं आहे. 10 डिसेंबरपर्यंत जिल्ह्यात 11 लाखांहून अधिक लाभार्थ्यांना या गोळ्या दिल्या जातील अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सचिन देसाई यांनी दिली. 1 ते 19 वर्षे वयोगटातील सर्व मुलांमुलींना जंतनाशक गोळी देऊन त्यांचं आरोग्य चांगलं ठेवणं, पोषण स्थिती, शिक्षण आणि जीवनाचा दर्जा उंचावणं असा या मोहिमेचा उद्देश आहे.

**गाळप**

पुणे जिल्ह्यातील पाच सहकारी आणि चार खासगी साखर कारखान्यांच्या ऊस गाळप हंगामास सुरुवात झाली आहे. साखर आयुक्तालयाकडून 175 साखर कारखान्यांना यंदा गाळपाचे ऑनलाइन परवाने देण्यात आले.  पुढील पंधरा दिवसांत गाळप वाढून साखरेचं उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. मागील पंधरा दिवसांत नऊ साखर कारखान्यांनी सात लाख 40 हजार टनांहून अधिक ऊसाचं गाळप पूर्ण केलं आहे. त्यातून पाच लाख 19 हजार 683 क्विंटल साखरेचं उत्पादन मिळालं. पुणे जिल्ह्यात गाळप हंगामात सुमारे एक कोटी 49 लाख टनांहून अधिक म्हणजे 15 लाख टन अधिक ऊसाचं गाळप अपेक्षित आहे.

**पुल**

चिंचवड इथं मुंबई-पुणे महामार्ग ते प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या दिशेनं जाणा-या मार्गादरम्यान रेल्वे मार्गावर नव्यानं पूल उभारण्याबाबतच्या प्रस्तावाला पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मंजुरी दिली. चिंचवड स्टेशनवरुन चिंचवड गावाकडं जाणाऱ्या डाव्या बाजुकडील पुलाचं आयुर्मान संपलं असल्यानं तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीनं या पुलाची पाहणी करण्यात आली होती. नव्यानं पूल उभारण्याबाबत महानगरपालिकेला भारतीय रेल्वे विभागाकडून सूचित करण्यात आलं आहे.

**अर्थसंकल्प**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सन 2025-26 पासून नियमित अर्थसंकल्पासोबत पर्यावरणीय अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. त्यानुषंगानं महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत आहे. विविध कामासाठी लागणारी आर्थिक तरतूद अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करताना संबंधित प्रकल्प, उपक्रमामध्ये पर्यावरणीय दृष्टीकोनातून कोणते मुद्दे, घटक महत्वाचे आहेत आणि त्यासाठी आर्थिक तरतूद निश्चित करण्यात येणार आहेत.

**सिस्टीम**

अधिकाधिक पारदर्शकता आणून गतीनं कामं मार्गी लावण्यासाठी पुणे महापालिका प्रशासनानं इंटेलिजेंट वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीमचा वापर सुरू केला आहे. यामुळं एकाच ठिकाणी विविध विभागांची कामं करताना कामांचं नियोजन, दुबार कामं रोखणं यांसह कामाचं पूर्वगणनपत्रक तयार करण्यापासून ते कामाचे देयक देण्यापर्यंतची सर्व कामं ऑनलाइन आणि कागद-विरहित होणार आहेत. पुणे महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी पत्रकारांना ही माहिती दिली.

**मूत्राशय**

मूत्राशयाच्या किचकट शस्त्रक्रियांच प्रात्यक्षिक, मूत्राशय, प्रोस्टेटसंबंधी गुंतागुंतीचे आजार आणि आधुनिक उपचार पद्धती याविषयी चर्चा करण्यासाठी बाणेर इथल्या युरोकुल युरॉलॉजी इन्स्टिट्यूटच्या वतीनं 7 आणि 8 डिसेंबरला आंतरराष्ट्रीय कार्यशाळा होणार आहे. युरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पाचशे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ यूरोलॉजिस्ट या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत.

**सोहळा**

भीमा कोरेगाव इथं 1 जानेवारी रोजी होणाऱ्या विजयस्तंभ शौर्यदिन सोहोळ्याच्या दृष्टीनं सर्व पायाभूत सुविधा पुणे जिल्हा प्रशासन आणि समन्वय समितीच्या वतीनं करण्यात येत असल्याची माहिती समितीचे समन्वय अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अभिवादन सोहळा परिसरामध्ये एक जानेवारीला विविध राजकीय पक्षांच्या सुमारे 11 सभा आणि संमेलनं आयोजित करण्यात आली आहेत.

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 31 तर किमान 23 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**